शासनाच्या मार्गदर्शक तत्वांचे काटेकोर
पालन करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक - टिआरएस १००८/प्रक्र ५८/३१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक २२ एप्रिल २०१०

## शुध्दीपत्रक

मा.सभापती, विधान परिषद, मा. अध्यक्ष, विधान सभा, यांच्या जिल्हा भेटीच्या वेळेस त्यांचे स्वागत व निरोप देण्याबाबत मॅन्युअल ऑफ प्रोटोकॉल आणि सेरिमोनीअल्स दि.३०/६/१९६५ मधील प्रक्र-४ मध्ये असलेल्या तरतुदीत सुधारणा करण्याचे प्रस्तावित होते. त्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रक क्र.टिआरएस १००८/प्रक्र ५८/३१, दिनांक २१/४/२०१० न्वये सुधारित मार्गदर्शक तत्वे निर्गमित करण्यात आली आहेत. सदर सुधारित मार्गदर्शक तत्वाच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रक क्रमांक टिआरएस/१००८/प्रक्र ५८/३१ दिनांक २१/१०/२००८ चे परिपत्रक आता खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.

" शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र.टिआरएस १००८/प्रक्र ५८/३१, दि.२१/४/२०१० न्वये, मॅन्युअल ऑफ प्रोटोकॉल ॲन्ड सेरीमिनीअल्स मधील भाग क्र.४ मध्ये खालीलप्रमाणे मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात आली आहेत.

| पदनाम | मार्गदर्शक तत्वे |
|---|---|
| मा.सभापती विधान परिषद, मा.अध्यक्ष,विधान सभा | कार्यभार स्विकारल्यानंतर पहिलीच भेट असेल तर - जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त/पोलीस अधिक्षक हे मान्यवरांच्या स्वागत व निरोपाकरिता उपस्थित असतील. त्यानंतरच्या जिल्हा मुख्यालयाच्या प्रत्येक भेटीच्या वेळेस अपर जिल्हाधिकारी/ उप पोलीस आयुक्त/ अतिरिक्त पोलीस अधिक्षक मान्यवरांच्या स्वागत व निरोपाकरिता उपस्थित असतील. जिल्हा मुख्यालया व्यतिरिक्त जिल्ह्याच्या इतर ठिकाणी भेटीच्या वेळेस,उप विभागीय अधिकारी/उप विभागीय प्रकल्प अधिकारी -/ गट विकास अधिकारी स्वागत व निरोपाकरिता उपस्थित असतील. मान्यवरांच्या वास्तव्याच्या ठिकाणी जिल्हाधिकारी , पोलीस आयुक्त/ पोलीस अधिक्षक उपस्थित असतील तर त्यांनी मान्यवरांची सदिच्छा भेट घ्यावी. |

GB
सर्व SDO ना
BDO ना
पत्र
7/5

Submitted for perusal
PRO
Collector Pune.

Borkar W.S. Jup

ROTA/H-693[350-4-10]

[कृ.मा.प.]

उपरोक्त मार्गदर्शक तत्वानुसार मा.सभापती विधान परिषद, मा. अध्यक्ष विधान सभा यांच्या जिल्हाच्या दौ-याच्या वेळी आवश्यक ती कार्यवाही करणे हि जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त, पोलीस अधिक्षक व इतर सर्व संबंधीत अधिका-यांची प्रथम जबाबदारी आहे.

सदर मार्गदर्शक तत्वांची काटेकोरपणे कार्यवाही करण्यांत येईल याबाबतची सर्व संबंधितांनी दक्षता घ्यावी. व मान्यवरांच्या दौऱ्याच्या कालावधीत त्यांचा मानसन्मान राखला जाईल व कोणत्याही परिस्थितीत त्यांची गैरसोय होणार नाही याबाबत सर्व संबंधितांनी दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( सुमीत मल्लिक )
प्रधान सचिव व मुख्य राजशिष्टाचार अधिकारी

प्रति,

मा. सभापती, विधान परिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.अध्यक्ष, विधान सभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा. उपसभापती, विधान परिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.उपाध्यक्ष, विधान सभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, विधान मंडळ सचिवालय, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त
सर्व पोलीस आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषदा
सर्व जिल्हा पोलीस अधिक्षक

Borkar W.S.

H-693-19